# अर्थपूर्ण

फेब्रुवारी २०१४ | ₹४०
पुणे, वर्ष ४, अंक २

**आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत**

## भारत २०१४ : बँकिंगच्या दिशेने

राष्ट्रीयीकृत बँकांचे विलिनीकरण
नव्या खासगी बँकांना एन्ट्री
पहिली महिला राष्ट्रीय बँक

बीटकॉईनः 'पर्यायी चलन'
ब्लॉगिंगचा व्यावसाय

बंद पडलेल्या पॉलिसी
कहाणी 'पी.पी.एफ'ची

फॉरेक्स ट्रेडिंगचा विळखा
'ऑप्शन्स' ट्रेडिंगची ओळख
शेअर बाजार : खेळ मनोव्यापारांचा
शेअरबाजार आणि अर्थनीती

संपादक | सहसंपादक
यमाजी मालकर | सम्राट शिरवळकर

editor.arthapurna@gmail.com

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
१०४ निलगिरी अपार्टमेंट्स, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
फोन : ०२०- ३२६००९९६
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

फेब्रुवारी २०१४

वर्ष चौथे
अंक दुसरा

**डिझाईन :**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
९८८१०९८०१०

**अक्षर जुळणी :**
माधुरी खत्री

**मुद्रितशोधन :**
विजय जोशी

**व्यवस्थापन साहाय्य :**
स्वप्नील भिलारे

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediastation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्कः
०२०-३२६००९९६
९९२३३३९९३३
arthapurna.monthly@gmail.com

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.

# अनुक्रमणिका

०६ **अर्थसाक्षरतेचे बी तर पेरले गेले...**यमाजी मालकर

०८ **राष्ट्रीयीकृत बँकांचे विलिनीकरण आता अनिवार्य !...**दिवाकर लेले

१५ **नव्या खासगी बँकांना एन्ट्री ...**जयंत मराठे

१८ **'सबल महिला-बलवान भारत'...**वंदना धर्माधिकारी

२२ **बीटकॉईन :एक 'पर्यायी चलन'...**भूषण पाटील

२६ **भारतीय शेअरबाजार आणि अर्थनीती...**गिरीश कुलकर्णी

३० **ब्लॉगिंगचा व्यावसायिक वापर...**कांचन कराई

३२ **बंद पडलेल्या आयुर्विमा पॉलिसीज ...**विजय तरवडे

३४ **कहाणी 'पी.पी.एफ'ची...**अरविंद जी. देशमुख

४० **घर विकत घेताना...**ॲड. अंजली झरकर

४२ **डिजीटल फॉरेक्स ट्रेडिंगचा विळखा...**किरण सराफ

४६ **'ऑप्शन्स' ट्रेडिंगची ओळख...**संदीप साठे

४८ **शेअर बाजारांतील तेजी-मंदी : खेळ मनोव्यापारांचा...**प्रसाद भागवत

**शेकिंग न्यूज...**चंद्रशेखर मोरेश्वर देशपांडे

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **मुख्य संपादक : यमाजी मालकर**

# अर्थसाक्षरतेचे बी तर पेरले गेले...



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**बँकिंग वाढलेच पाहिजे, मोठ्या नोटा चलनातून काढून टाकल्याच पाहिजेत आणि करव्यवस्था सुलभ असलीच पाहिजे, ही समाजाला पुढे घेऊन जाणारी दिशा आहे. त्या दिशेविषयी वाद असण्याचे कारण नाही. आणि जे आपल्या समाजाला हवे आहे, ते चांगल्या मार्गांनी साध्य करणे, हे नेत्यांचे, तज्ज्ञांचे आणि सुजनांचे काम आहे. ते कसे पुढे जात राहील, हे आपण सुजन म्हणून पाहूयात.**

'अर्थक्रांती'च्या पाच प्रस्तावांवर देशव्यापी चर्चा सुरू व्हावी, यासाठी 'अर्थक्रांती' प्रतिष्ठान गेली १४ वर्षे प्रयत्नशील होते आणि गेल्या दोन महिन्यांत ती तशी सुरू झाली. 'अर्थक्रांती'ला ओळखणारे नागरिक विचारत आहेत, की पुढे काय होणार? या देशात खरोखरच 'अर्थक्रांती' होणार का? भारतीय जनता पक्ष हा विषय पुढे नेण्याचे धाडस करणार काय? चंद्राबाबू नायडू यांनी आधीच हा विषय आपल्या राजकीय अजेंड्यात घेण्याचे जाहीर केले होते, त्याचे काय झाले? रामदेवबाबा यांनी वेगळाच प्रस्ताव समोर आणला आहे, त्याचे काय होणार? प्रस्तावावर उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे, यातून हा विषय मागे तर पडणार नाही ना? एवढे क्रांतिकारी बदल आपल्या देशामध्ये होऊ शकतात काय? आपल्या देशात केवळ ४५ टक्के नागरिक बँकिंग करतात, अशा परिस्थितीत बँक व्यवहार कर व्यवहार्य ठरू शकतो का? एक ना अनेक... 'अर्थक्रांती'च्या प्रस्तावांची चर्चा राष्ट्रीय पातळीवर सुरू झाल्याने शेकडो प्रश्न, शंका उपस्थित होत आहेत.

एक लक्षात घेतले पाहिजे की हा काही एक व्यक्ती, संस्था, गाव, शहर, राज्य आणि देशापुरता मर्यादित विषय नाही. आपण ज्या व्यवस्थेत राहत आहोत, त्या व्यवस्थेच्या बदलाचा विषय आहे. अशा बदलाला सहसा कोणीच पहिल्या फटक्यात तयार होत नाही. कारण आता अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेत अनेकांचे अनेक हितसंबंध असतात. मुळात अशा हितसंबंधांतूनच सध्याची व्यवस्था तयार झाली आहे. अगदी करपद्धतीचेच पहा. भारतातील संपत्ती लुटण्यासाठीचा एक कायदेशीर मार्ग म्हणूनच ब्रिटिशांनी वेगवेगळ्या नावांनी अनेक करांची वसुली सुरू केली. खरे म्हणजे आपल्या इतिहासात या लुटीची अनेक प्रकरणे आपण शिकलो आहोत, मात्र तो इतिहास आपण परीक्षेपुरताच मर्यादित ठेवला. भारतीय शेतकऱ्यांकडून शेतसारा त्याच्या शेतात येणाऱ्या अन्नधान्यात न स्वीकारता चलनात म्हणजे रुपयात स्वीकारला जाईल, असा इंग्रजांनी फतवा काढला. त्याला झालेला विरोध मोडून काढला. अन्नधान्याचे उत्पादन हा शेतकऱ्यांचा विषय होता, मात्र इंग्रजांनी त्यांना रुपयाच्या अर्थव्यवस्थेत आणून ठेवले. आज १५० वर्षांनी रुपया हे आपले भारतीयांचे चलन आहे, मात्र जगाने आपल्याला डॉलरच्या अर्थव्यवस्थेत आणून ठेवले. या स्थित्यंतराचा उल्लेख यासाठी केला की विषयाची व्याप्ती लक्षात यावी.

मुद्दा असा आहे की सगळे आयुष्य आज त्या पैशांभोवती फिरते आहे. त्या पैशांचा संबंध जागतिकीकरणाशी आहे. देशातल्या करपद्धतीशी आहे. पैशांचे देवघेव करणाऱ्या बँकिंगशी आहे. त्याहीपेक्षा अधिक व्यवहार रोखीने होतात, त्याच्याशी आहे. मोठ्या नोटा (१०००, ५००,१००) चांगल्या नसतात, हे अर्थशास्त्र सांगते, त्याच्याशी आहे. आणि या पैशाच्या असण्याने जी कोट्यवधी आयुष्य उभी राहतात, त्याच्याशी आणि कोट्यवधी

आयुष्य मारली जातात, त्याच्याशीही आहे. त्याच्याविषयी एक खुली चर्चा ’अर्थक्रांती’च्या प्रस्तावांच्या निमित्ताने देशात सुरू झाली, ही फार महत्त्वाची गोष्ट झाली आहे.

भारतीय माणूस आणि समूहांना बदनाम करण्याचा करंटेपणा करताना आता जीभ अडखळायला लागेल. भारतीय श्रमशक्तीला बदनाम करणारे तथाकथित तज्ज्ञ पुनर्विचार करण्यास प्रवृत्त होतील. आणि तेवढेच महत्त्वाचे म्हणजे आजच्या विसंगतींकडे पाहताना एक व्यापक, निरपेक्ष दृष्टिकोन मनामनात तयार होऊ लागेल. भारतीय समाजाच्या प्रश्नांच्या संदर्भात साप समजून भुई (जमीन) धोपटण्याचा जो सपाटा इझम्समध्ये अडकलेले आणि व्यवस्थेनेच सोडविले पाहिजेत असे प्रश्न समाजसेवा आणि अध्यात्माच्या माध्यमातून सोडविण्याचे केविलवाणे प्रयत्न करणारे आहेत, त्यांच्या मर्यादा आता भारतीय नागरिकाच्या लक्षात येऊ लागतील. अशा दावेदारांना आता अर्थसाक्षर भारतीय नागरिकच अडवायला लागतील. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक आघाडीवर नेतृत्व करू इच्छिणाऱ्यांनाही आर्थिक प्रश्न विचारायला सुरुवात होईल. ’अर्थक्रांती’ची सुरुवात अशी अर्थसाक्षरतेचे बी पेरण्यापासून म्हणजे व्यवस्थेविषयी विचार करायला लागलेल्या माणसामाणसांपासून होईल.

अर्थसाक्षरतेत सर्वांत प्राथमिक आणि सर्वांत महत्त्वाचा मुद्दा कोणता असेल तर तो बँकिंगचा. १२५ कोटींचा हा खंडप्राय देश बँकिंगशी जोडणे, हे काम इतकी वर्षे फार अवघड वाटत होते, मात्र आधुनिक तंत्रज्ञान आपल्या मदतीला आले आहे. संगणक आणि मोबाईल नावाचे तंत्रज्ञान भारतात आले तेव्हा त्याच्या व्यवहार्यतेविषयी असेच प्रश्न उपस्थित झाले होते. ते काही श्रीमंत समूहांचीच मक्तेदारी होईल, असे म्हटले जात होते. सामान्य माणसाला ते वापरताच येणार नाहीत, असेही बोलले जात होते. मात्र काळाने म्हणजे अवघ्या दीड-दोन दशकांनी सर्व अंदाज खोटे ठरविले. संगणकाचा दैनंदिन वापर आज कितीतरी पटींनी वाढल्याचे आपण पाहत आहोत आणि तब्बल ७० कोटी भारतीय मोबाईल वापरू लागले आहेत. तंत्रज्ञानाचा हा स्वीकार ही या समाजातील एक क्रांतीच आहे. या तंत्रज्ञानावर आधारित या देशात बँकिंग सुद्धा या किंवा यापेक्षा अधिक वेगाने येऊ घातले आहे.

चलन ही खासगी मालकीची वस्तू नव्हे, ते केवळ चलनवलनाचे माध्यम आहे, या मूलभूत तत्त्वाचा स्वीकार करावाच लागेल, असे नियती आज ओरडून सांगते आहे आणि जाणकार माणसे ती हाक ऐकत आहेत, अशा काही घटना घडताना दिसू लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून बँकिंगचा विस्तार करण्यासाठी सरकार सरसावले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. आर्थिक सर्वसमावेशकता (Financial Inclusion) च्या समितीचे प्रमुख नचिकेत मोर यांनी रिझर्व बँक ऑफ इंडियाला अलीकडेच सादर केलेला अहवाल, हे त्या दिशेने जाणारे मोठे पाऊल ठरणार आहे. प्रत्येक १८ वर्षांच्या नागरिकाचे बँक खाते असलेच पाहिजे, असे १ जानेवारी २०१६ पासून होऊ शकते काय, आधार कार्ड हाच बँकेत खाते उघडण्याचा मार्ग होऊ शकतो काय, याची पडताळणी केली जात आहे आणि त्यात फार मोठी अडचण येण्याचे कारण नाही. मोबाईल बँकिंग, टपाल कार्यालयांत बँक सेवांचा विस्तार करणे, काही दुकानांना प्राथमिक बँक सेवा पुरविण्यासाठी




प्रोत्साहन देणे असे अनेक पर्याय समोर येत आहेत. बँकिंगविषयी आज जी अडथळ्यांची शर्यत मांडली जाते, तिच्यात आमूलाग्र बदल होऊ घातला आहे. त्या बदलाच्या माध्यमातून वरील सर्व प्रश्नांना उत्तरे मिळत जातील. यात एखादा पक्ष, एखादी संघटना, एखादा नेता आणि त्याच्या तात्कालिक कृती महत्त्वाच्या नसून हा भारतीय नागरिकांच्या अपरिहार्य आर्थिक स्वातंत्र्याचा विषय आहे, हे समजून घेतले की मग मनात काही शंका राहत नाहीत.

बँकिंग वाढलेच पाहिजे, मोठ्या नोटा चलनातून काढून टाकल्याच पाहिजेत आणि करव्यवस्था सुलभ असलीच पाहिजे, ही समाजाला पुढे घेऊन जाणारी दिशा आहे. त्या दिशेविषयी वाद असण्याचे कारण नाही. आणि जे आपल्या समाजाला हवे आहे, ते चांगल्या मार्गांनी साध्य करणे, हे नेत्यांचे, तज्ज्ञांचे आणि सुजनांचे काम आहे. ते कसे पुढे जात राहील, हे आपण सुजन म्हणून पाहूयात. ■